# —:: न्यायनिर्णय ::—

( दिनांक १३/०२/२०१९ रोजी पारीत )

१) मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षा पात्र गुन्हयाकरीता अभियोग पक्षाने आरोपीविरूद्ध खटला चालविलेला आहे.

२) खटल्यातील तथ्य, साक्ष आणि पुरावा इ. चे मनन केल्यानंतर खालिल मुद्दे माझ्या निर्णयास्तव उद्भवले असुन त्यावरील निष्कर्ष मी त्यापुढे कारणमिमांसेसह नमूद केलेले आहेत.

| निश्चयार्थ प्रश्न ( मुद्दे ) | निष्कर्ष |
|---|---|
| १) दिनांक ०२.०४.२०१७ रोजी सायंकाळी १९:०० ते २०:०० वाजताचे दरम्यान मौजा मुल टि पाईंट गोंडपिपरी, तह. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर येथे आरोपीच्या ताब्यात ११२ नग विदेशी दारूने भरलेली शिशी १८० मि.ली अंदाजे किंमत रूपये १६,८००/— असा मुद्देमाल विनापरवाना व अवैधरित्या बाळगुन ठेवल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय ? | .... नकारार्थी. |
| २) आदेश काय ? | .... आरोपीची निर्दोष मुक्तता. |

## —:: कारणमिमांसा ::—

३) अभियोग पक्षातर्फे आरोपीविरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी एकुण

दोन साक्षीदारांना तपासले. त्यात अ.सा.क्र.१ पद्माकर शाम मुंडे, तपासी अंमलदार; व अ.सा.क्र.२ सतिश भिवाजी नेवारे, पंच यांचा समावेश आहे. उपरोक्त साक्षीदारांची साक्ष तपासल्यानंतर अभियोग पक्षास पुरेशी संधी मिळून देखील अभियोग पक्ष इतर उर्वरित साक्षीदार तपासण्यात असमर्थ ठरला.

४)　　आरोपीविरूध्द उपरोक्त गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षास हे सिध्द करणे आवश्यक आहे की आरोपीने जिल्हयात दारूबंदीचे शासनाचे आदेश असतांना देखील त्याने त्याच्या ताब्यात विनापरवाना व अवैधरित्या उपरोक्त दारू बाळगुन ठेवली व त्याद्वारे जिल्हयात दारूबंदीच्या शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केले.

## मुद्दा क्र. १ बाबत

५)　　अ.सा.क्र.१ पद्माकर मुंडे हे फिर्यादी असुन यांनीच गुन्हया तपास देखील केला. यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दिनांक ०२.०४.२०१७ रोजी ते पोलीस स्टेशन गोंडपिपरी येथे कार्यरत असतांना त्यांना माहिती मिळाली की आरोपी इंडीका कारमध्ये दारू घेवून येत आहेत. त्यावरून त्यांनी पोलीस स्टाफ व पंचांसह मुल टी पाईंटवर नाकाबंदी केली. आरोपी इंडीका कार क्र. ए.पी.२४ एस.५२९८ मधून आले. त्यांची तपासणी केली असता त्यांच्या ताब्यात एकूण ११२ नग विदेशी दारूने भरलेल्या शिश्या मिळून आल्या. त्याबाबत त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामे करून दारू जप्त केली

व १ शिशी रासायनिक तपासणीकरीता राखुन ठेवली. त्यानंतर त्यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले. मुद्देमाल रासायनिक तपासणीकरीता पाठविले. तपासादरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यात अवैधरित्या दारू बाळगल्याचे निष्पन्न झाले.

६) उपरोक्त अ.सा.क्र.१ यांचा आरोपीतर्फे उलटततपास घेण्यात आला. मात्र त्यात देखील आरोपीस उपयुक्त असे काहीही त्यांनी कथन केले नाही. याउलट आरोपींतर्फे देण्यात आलेल्या प्रतिकुल सुचना त्यांनी नाकारल्या. उपरोक्त सा.क्र.१ हे पोलीस विभागात कार्यरत असुन ते फिर्यादी व त्यांनी गुन्हयाचा तपास देखील केला. त्यामुळे त्यांच्या साक्षीस इतर स्वतंत्र साक्षीदाराचा दुजोरा प्राप्त होणे क्रमप्राप्त ठरते.

७) अ.सा.क्र.२ सतिश नेवारे हा पंच साक्षीदार असुन त्याच्या साक्षीत असे कथन केले की पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी मुल टी पाईंट येथे बोलाविले होते. तेथे त्यांच्यासमक्ष पंचनामे करण्यात आले. आरोपींच्या ताब्यातून ११२ नग विदेशी दारूच्या शिश्या जप्त करण्यात आल्या. सदरील पंच साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. त्यात त्यांनी हे मान्य केले की त्यांनी अनेक खटल्यांमध्ये पंच म्हणून साक्ष दिलेली आहे. तसेच त्यापैकी अनेक पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सह्या केलेल्या आहेत.

याव्यतिरिक्त सदरील पंच साक्षीदारांनी आरोपीतर्फे देण्यात आलेल्या प्रतिकुल सुचना नाकारल्या.

८) अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अ.सा.क्र.१ हे पोलीस विभागात कार्यरत असुन स्वत: फिर्यादी व तपासी अंमलदार आहेत. त्यामुळे उपरोक्त त्यांच्या साक्षीस इतर स्वतंत्र साक्षीदारांचा दुजोरा प्राप्त होणे गरजेचे आहे. जरी अ.सा.क्र. २ या पंच साक्षीदारानी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे कथन केले असले तरी त्यांनी आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात हे मान्य केले की त्यांनी हे मान्य केले की त्यांनी अनेक खटल्यांमध्ये पंच म्हणून साक्ष दिलेली आहे. तसेच त्यापैकी अनेक पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सह्या केलेल्या आहेत. परिणामी सदर पंच साक्षीदाराची साक्ष ठोस, सबळ व विश्वासार्ह दिसून येते नाही. परिणामी सदर पंच अ.सा.क्र. २ यांची साक्ष आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत ठोस, सबळ व विश्वासार्ह आहे असे म्हणता येत नाही. परिणामी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याच्या सत्यतेबाबत शंका निर्माण होते व त्यामुळे अ.सा.क्र. १ या पोलीस कर्मचा—याच्या साक्षीस ठोस, सबळ व विश्वासार्ह पुराव्याचा पुरेपुर आधार प्राप्त झाला असे म्हणता येणार नाही. परिणामी इतर स्वतंत्र साक्षीदारांच्या पुराव्या अभावी अ.सा.क्र.१ यांची साक्ष औपचारीक पध्दतीचीच ठरल्याची दिसून येते. त्याचप्रमाणे अभियोग

पक्षामार्फत उर्वरित साक्षीदारांना सदर प्रकरणात तपासण्यात अपयश आलेले आहे. परिणामी सदर अपराधाबाबत समाधानकारक व पुष्टीदायक बाबी न्यायालयाच्या पटलावर मांडणे अभियोग पक्षास अवघड गेले आहे.

९) अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल न्यायालयामध्ये पुराव्याकामी दाखल केला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल दारूच होता असे मानता येणार नाही. अभियोग पक्षाने प्रकरणामधील जप्त मुद्देमाल हा ज्यांनी रासायनिक विश्लेषणाकरिता रासायनिक प्रयोगशाळा नागपुर येथे नेला त्यांना प्रकरणामध्ये तपासलेले नाही, त्यामुळे आरोपीकडूनच जप्त करण्यात आलेला मुद्देमाल त्यांनी रासायनिक विश्लेषणाकरीता नागपूर येथे नेला होता काय हे स्पष्ट होउ शकले नाही. परिणामी अभियोग पक्षाने आरोपींविरूध्द उपरोक्त गुन्हा सिध्द होण्याकरिता कोणताही ठोस, सबळ, खात्रीलायक व विश्वासार्ह पुरावा प्रकरणामध्ये नोंदविला नाही. वरील कारणांवरून आरोपी हा सदर गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. परिणामी मी निश्चयार्थ प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

## मुद्दा क्र.२ बाबत :

१०) मुद्दा क्र.१ वरिल माझ्या उपरोक्त नकारार्थी निष्कर्षामुळे आरोपीची मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५(ई) व भारतीय दंड संहिताचे कलम १८८ मधुन निर्दोष मुक्तता करणे भाग आहे. जप्त मुद्देमाल

म्हणजेच विदेशी दारू योग्य त्या विल्हेवाटीसाठी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्याचा आदेश करणे योग्य होईल. तसेच मुद्देमाल इंडीका कार ही मालकिची कागदपत्रांची तपासणी करून मुळ मालकास परत देण्याचा आदेश करणे उचीत होईल. म्हणुन मी  मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करतो.

—:: आदेश ::—

१) आरोपी पुरूषोत्तम भिक्षापती चिलमुला व सुखदेव गोविंद माहुरकर यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५(ई) नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. त्याला सोडून देण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामिनपत्र रद्द करण्यात येते.

३) सदरील मामल्यातील मुद्देमाल उपरोक्त दारू अपिल कालावधीनंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क चंद्रपुर यांचेकडे कायदेशीररितीने नष्ट करण्याकरिता पाठविण्यात याव्यात.

४) आरोपीने फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम ४३७—अ मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येकी ५,०००/— रूपयांची जामीन दयावी. ती जामिन ६ महिन्यांकरीता असेल.

५) जप्त इंडीका कार मालकी हक्काच्या कागदपत्रांची पडताळणी करून मुळ मालकास परत करावी.

६) आरोपीला खुले करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)

स्वा/–
( विकास डी. बडे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
गोंडपिपरी.

दिनांक : १३/०२/२०१९